माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ८६१/२०२१**

**अपिलार्थी, श्री. कृष्णा पंचम खोपडे (आमदार पूर्व नागपूर)**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
सदर विभाग, नागपूर शहर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
परिमंडळ क्र.२, नागपूर शहर

**अंतरिम सुनावणी दिनांक : १२.१२.२०२२**
**अंतरिम सुनावणी दिनांक : ०४.०१.२०२३**
**अंतीम सुनावणी दिनांक : २४.०१.२०२३ व २०.०२.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित (प्रतिनिधी)** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **अनुपस्थित** |

अपिलार्थी श्री. कृष्णा पंचम खोपडे (आमदार, पूर्व नागपूर) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २६.०३.२०२१ रोजी** " प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष माहिती दिली नसून संबंधित कार्यालयाकडे पाठविल्याचे सांगितल्यामुळे प्रत्यक्ष माहिती मिळण्याबाबत" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आयोगाने मागील दिनांक १२.१२.२०२२ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे अंतरिम आदेश पारीत केले आहे.

"सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. कृष्णा पंचम खोपडे (आमदार, पूर्व नागपूर) यांनी दिनांक १२.१०.२०२० रोजी सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर शहर यांनी दिनांक २४.११.२०२० रोजी अपिलार्थीस प्रतिसाद दिलेला आहे. त्यात मुद्दा क्र. १ बाबत तक्रार अर्ज हा पुढील चौकशीकरीता आर्थिक गुन्हेशाखा, नागपूर शहर यांच्याकडे वर्ग होणेकरीता पो.स्टे. जा.क्र.२०६८/२०२०, दिनांक २२.०६.२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर येथे पाठविण्यात आला आहे. तसेच मुद्दा क्र. २ बाबतचा तक्रार अर्ज पुढील कार्यवाही करीता अध्यक्ष नागपूर स्मार्ट अॅन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. (NSSCDCL) येथे पाठविण्यात आलेला असल्याचे अपिलार्थीस सुचीत केले आहे. त्याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत सुनावणी घेवून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली माहिती संयुक्तीक व योग्य दिसून येत असल्याचा निष्कर्ष काढून अपील



Scanned with OKEN Scanner

अर्ज निकाली काढलेला आहे. परंतू अपिलार्थी यांनी प्रत्यक्षात माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप घेत आयोगासमोर व्दितीय अपील दाखल केले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २४.११.२०२० रोजी दिलेल्या प्रतिसादाच्या अनुषंगाने अद्ययावत माहिती (Current Stetus) ही आर्थिक गुन्हेशाखा, नागपूर शहर तसेच नागपूर स्मार्ट अॅन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. (NSSCDCL) यांचेकडून प्राप्त करुन घेवून पुढील सुनावणी दिनांक ०४.०१.२०२३ रोजी आयोगासमक्ष व्यक्तीश: सादर करावी. वरील आदेशाची एक प्रत अध्यक्ष, नागपूर स्मार्ट अॅन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. (NSSCDCL), मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर तसेच विद्यमान महानगरपालिका आयुक्त, नागपूर यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे."

उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने दिनांक ०४.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सदर सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित होते. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर शहर यांचेतर्फे सहायक पोलीस निरीक्षक, श्री. देविदास चोपडे उपस्थित होते. सदर प्रकरणात पुनश्च: दिनांक ०४.०१.२०२३ रोजी खालीलप्रमाणे अंतरिम आदेश पारीत करण्यात आलेले आहे.

" आयोगाच्या दि. १२.१२.२०२२ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने आज दिनांक ०४.०१.२०२३ रोजी विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्या वतीने लेखी खुलासा सादर करण्यात आलेला असून त्यात त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"अपिलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहिती संबंधाने पोलीस ठाणे सदर कडून अद्ययावत माहिती मागविण्यात आली असता, पोलीस ठाणे सदर कडून दि.२७.१२.२०२२ रोजी वर नमूद तक्रारी संबंधाने आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर तसेच नागपूर स्मार्ट अॅन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमी. (NSSCDCL) यांचेशी पत्र व्यवहार करण्यात आला. अपिलकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे मुद्दा क्र.१ संबंधाने आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर यांचेकडून प्राप्त माहिती मध्ये अर्जदार श्री. संदिप जोशी म.न.पा, श्री. संदिप जाधव सत्तापक्ष नेता, म.न.पा. यांनी नागपूर स्मार्टसिटी मधील २० कोटी चे गैरव्यवहाराबाबत दिलेला अर्ज मा. सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आदेशाने जा.क्र.सह पोआना/१५६/२०२०, दिनांक ३०.०६.२०२० अन्वये मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे योग्य कारवाई करीता पाठविण्यात आला असल्याचे लेखी कळविले आहे. तसेच मुद्दा क्र.२ संबंधाने अर्जदार सौ. भानुप्रिया ठाकुर, सचिव, स्मार्ट सिटी, नागपूर यांनी मा. तुकाराम मुंढे माजी निगम आयुक्त यांच्याविरुध्द दि. २९.०६.२०२० रोजी पो.ठाणे सदर येथे दिलेल्या तक्रारी संबंधाने मा. चेअरमन, नागपूर स्मार्ट सिटी, नागपूर यांचेशी पत्रव्यवहार केला असता त्यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त नाही."

तसेच पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन, सदर नागपूर शहर यांचेकडून दिनांक २७.१२.२०२२ रोंजी मा. चेअरमन, नागपूर स्मार्ट सिटी, (NSSCDCL) नागपूर शहर यांना पत्र जारी केले असून अर्जदार भानुप्रिया ठाकूर आणि सुभांगी गाढवे यांनी मा. तुकाराम मुंढे यांच्याविरुध्द दि. २८.०६.२०२० रोजी पोलीस ठाणे सदर नागपूर शहर येथे दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जावक क्र.१५७/२०२०, दिनांक ०२.०७.२०२०

रोजी अग्रेषित केलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली, याचा खुलासा सादर करण्याबाबत सुचीत केले आहे. त्याचप्रमाणे पोलीस उपआयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर यांना देखील दिनांक २७.१२.२०२२ रोजी तत्कालीन महापौर, तत्कालीन सत्तापक्ष नेता व विद्यमान आमदार पूर्व नागपूर यांनी दाखल केलेल्या आर्थिक कथीत गैरव्यवहाराबाबतची तक्रार जावक क्र.२०६८/२०२०, दि. २२.०६.२०२० रोजी आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचेकडे अग्रेषित केलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली याची माहिती देण्याबाबत विनंती केली असता, पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचेकडून दिनांक २९.१२.२०२२ रोजी सदर अर्जा संबंधाने आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर येथील अभिलेखाची पडताळणी केली असता, सदर अर्ज मा. सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आदेशाने जा.क्र.सह पोआना/१५३/२०२०, दि.३०.०६.२०२० अन्वये मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे योग्य कार्यवाहीकरीता पाठविण्यात आला आहे, असे कळविले आहे. मात्र ही माहिती सादर करीत असतांना आयोगाच्या मागील दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे दिनांक २२.०६.२०२० ते आजपर्यंत झालेल्या कार्यवाहीचा अद्ययावत अहवाल पाठवावा, असे सुस्पष्ट नमूद केले असता, वरील खुलाश्यासोबत तत्कालीन सह पोलीस आयुक्त यांचे पत्र तसेच नगर विकास विभाग येथील अपर मुख्य सचिव, यांना पाठविलेल्या पत्राची प्रत व त्यांचेकडून जारी करण्यात आलेल्या अभिप्रायाची अथवा यासंदर्भात झालेल्या पत्रव्यवहाराबाबत कोणतीही माहिती आयोगासमोर ठेवण्यात आलेली नाही.

तसेच याच प्रकरणात दिनांक २७.०८.२०२० रोजी नागपूर येथील फौजदारी न्यायालयाने Cri.M.A.No.१८९०/२०२०, Sandeep & other Vs. State या प्रकरणात जारी केलेल्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे करण्यात आलेले आरोप हे अतिशय गंभीर स्वरुपाचे असल्याने केलेली टिपणी, या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांनी सदर पोलीस स्टेशन येथे दाखल केलेला तक्रार अर्ज तसेच नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. (NSSCDCL) चे सचिव, सौ. भानुप्रिया ठाकुर यांनी दिनांक २९.०६.२०२० रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जातील गांभीर्य लक्षात घेता, याबाबत समाधानकारक माहिती सादर करण्यात आलेली नाही, हे स्पष्टपणे आढळून येते. त्यामुळे पोलीस उपआयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर यांनी या प्रकरणातील मुळ नस्तीसह आयोगासमोर दिनांक २४.०१.२०२३ रोजी व्यक्तीश: उपस्थित राहावे. तसेच नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. (NSSCDCL) चे मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा तेथील जबाबदार अधिकारी यांनी याबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवालासह या प्रकरणाशी संबंधित मुळ नस्ती घेवून आयोगासमोर दिनांक २४.०१.२०२३ रोजी व्यक्तीश: उपस्थित राहावे.

तसेच या प्रकरणात सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आदेशाने जा.क्र.सहपोआना/१५६/२०२०, दिनांक ३०.०६.२०२० अन्वये मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविलेल्या पत्रावर आजपर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीची तसेच वरील पत्राची हाताळणी ही कुठल्या स्तरावर झाली व या प्रकरणात तयार करण्यात आलेली टिपणी, नस्तीवरील नोंद व त्यावर घेण्यात आलेला प्रशासकीय निर्णय याबाबतच्या मुळ नस्तीची साक्षांकित प्रत देखील विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडून तात्काळ प्राप्त करुन आयोगासमोर सादर करावी. वरील आदेशाची प्रत १) मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई, २) मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर व ३) मा. मुख्य कार्यकारी



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

Scanned with OKEN Scanner

अधिकारी, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. (NSSCDCL) यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे."

उपरोक्त आदेशात निर्देशीत केल्याप्रमाणे सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आदेशान्वये जा.क्र.सहपोआना/१५६/२०२०, दिनांक ३०.०६.२०२० अन्वये मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविलेल्या पत्रावर आजपर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीची तसेच वरील पत्राची हाताळणी ही कुठल्या स्तरावर झाली व या प्रकरणात तयार करण्यात आलेली टिपणी, नस्तीवरील नोंद व त्यावर घेण्यात आलेला प्रशासकीय निर्णय याबाबतच्या मुळ नस्तीची साक्षांकित प्रत देखील विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडून तात्काळ प्राप्त करुन आयोगासमोर सादर करावी. तसेच वस्तुस्थितीदर्शक अहवाल आयोगास दिनांक २४.०१.२०२३ रोजी व्यक्तीशः उपस्थित राहून सादर करावा, असे सुचीत करण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक २४.०१.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग, श्रीमती विजयालक्ष्मी हिरेमठ उपस्थित आहेत. तसेच पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर, श्रीमती अश्विनी पाटील हया त्यांच्या कार्यासनात उपलब्ध असलेल्या अर्ज चौकशीच्या मुळ नस्तीसह उपस्थित आहेत. तसेच नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. (NSSCDCL) येथील जनरल मॅनेजर, श्री. आर.जे. दुफारे उपस्थित आहेत.

दिनांक २४.०१.२०२३ रोजीच्या सुनावणी दरम्यान सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग नागपूर शहर यांच्या वतीने सादर केलेल्या अहवालात अपिलकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे मुद्दा क्र. १ संबंधाने तक्रारदार संदिप जोशी महापौर, म.न.पा, संदिप जाधव सत्तापक्ष नेता, म.न.पा. यांनी मा. तुकाराम मुंढे (भाप्रसे) माजी निगम आयुक्त, मनपा यांच्या विरुध्द दिलेल्या तक्रार अर्जासंबंधाने माहिती मिळणेकरीता मा. पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर, मा. चेअरमन, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी, डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमी. नागपूर , तसेच मा. अतिरिक्त प्रधान सचिब, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. परंतु मा. चेअरमन, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी, डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमी. नागपूर , तसेच मा. अतिरिक्त प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडून माहिती अप्राप्त आहे. तसेच मुद्दा क्र. २ संबंधाने अर्जदार सौ. भानुप्रिया ठाकुर, सचिव, स्मार्ट सिटी, नागपूर यांनी मा. तुकाराम मुंढे (भाप्रसे) माजी नियम आयुक्त यांच्याविरुध्द दि.२९.०६.२०२० रोजी पो.स्टेशन सदर येथे दिलेल्या तक्रारीसंबंधाने मा. चेअरमन नागपूर स्मार्ट सिटी, नागपूर यांचेशी पत्रव्यवहार केला असता, त्यांचे कार्यालयाकडून प्राप्त माहितीमध्ये सदरचा तक्रार अर्ज मा. अध्यक्ष, NSSCDCL यांचेकडे स्पीड पोस्टाने पाठविण्यात आल्याचे कळविले आहे. NSSCDCL यांचेकडून प्राप्त माहिती दिनांक २४.०१.२०२३ रोजीच्या सुनावणी दरम्यान सादर करण्यात आलेली आहे. त्याचसंबंधाने सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग, नागपूर यांनी दिनांक २१.०१.२०२३ रोजी मा. अतिरिक्त प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई व मा. चेअरमन, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी, डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमी. नागपूर यांना या प्रकरणी आजपर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीची तसेच दिनांक ३०.०६.२०२० रोजीच्या पत्राची हाताळणी ही कुठल्या स्तरावर झाली व या प्रकरणात तयार करण्यात आलेली टिप्पणी, नस्तीवरील नोंद व त्यावर घेण्यात आलेला प्रशासकीय निर्णय याबाबतची माहिती सादर करण्याची विनंती केलेली आहे. मात्र यात दिनांक २४.०१.२०२३



Scanned with OKEN Scanner

रोजी सादर केलेला अहवाल फारसा समाधानकारक नसून नगर विकास विभागाकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नसल्याचे आढळून येते.

प्रस्तूत प्रकरणी अधिक तपशिल प्राप्त होईल, याची वाट पाहिल्यानंतर नगर विकास विभागाच्या वतीने कोणताही सकारात्मक प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे सदर प्रकरणी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

आयोगासमोर दिनांक ०४.०१.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. (NSSCDCL), श्री. अजय गुल्हाने, (भाप्रसे) यांनी दिनांक २०.०२.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने दिनांक २१.०२.२०२३ रोजी मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना दिनांक १७.०२.२०२३ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत व वस्तुस्थितीदर्शक अहवाल आयोगासमोर सादर केलेला आहे. यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी "सदर प्रकरण समकक्ष असलेले श्री. तुकाराम मुंढे (भाप्रसे) तत्कालीन मनपा आयुक्त यांचेशी संबंधित असल्याने व सदर या कार्यालयात प्राप्त बंद लिफाफे हे थेट अध्यक्ष यांच्या नावाने असल्याने तत्कालीन अध्यक्ष श्री. प्रविणसिंह परदेशी, भाप्रसे अध्यक्ष तथा अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या कार्यालयात स्पिड पोस्टाने पाठविण्यात आले होते. त्यावर तत्कालीन मा. अध्यक्ष यांच्या कार्यालयामार्फत काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदर प्रकरणावर नगर विकास विभागामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे याची माहिती या कार्यालयास होण्याकरीता त्यांच्या अधिनस्त अधिका-यांना निर्देश द्यावे जेणेकरुन सदर माहिती प्राप्त होण्यास मदत होईल व राज्य माहिती आयोगास त्याबाबत अवगत करणे शक्य होईल", असे नमूद केले आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, NSSCDCL, श्री. अजय गुल्हाने (भाप्रसे) यांनी दिनांक ०६.०२.२०२३ रोजी डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे, मा. अध्यक्ष, NSSCDCL नागपूर यांना सविस्तर पत्र पाठविले असून त्यात सदर प्रकरण समकक्ष असलेले श्री. तुकाराम मुंढे (भाप्रसे) तत्कालीन मनपा आयुक्त यांच्याशी संबंधित असल्याने व सदर प्रकरणात या कार्यालयात प्राप्त बंद लिफाफे हे थेट अध्यक्ष यांच्या नावाने असल्याने तत्कालीन अध्यक्ष श्री. प्रविणसिंह परदेशी, भाप्रसे अध्यक्ष तथा अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या कार्यालयात स्पिड पोस्टाने पाठविण्यात आले होते. त्यावर तत्कालीन मा. अध्यक्ष यांच्या कार्यालयामार्फत काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती प्राप्त झाली नाही. सदर प्रकरणावर काय कार्यवाही व्हावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागितलेले असल्याचे आढळून येते. याचसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, NSSCDCL, श्री. अजय गुल्हाने (भाप्रसे) यांनी पोलीस स्टेशन, सदर नागपूर शहर यांना त्यांच्या दिनांक २७.१२.२०२२ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दिनांक ०३.०१.२०२३ रोजी प्रतिउत्तर देखील खुलाश्यासोबत जोडण्यात आलेले आहे.

आयोगासमोर सादर केलेल्या सविस्तर खुलाश्यामध्ये मा. अध्यक्ष, NSSCDCL, डॉ.संजय मुखर्जी यांचे दिनांक १४.०२.२०२३ रोजी प्राप्त झालेले उत्तर देखील संलग्न करण्यात आलेले असून यात डॉ. मुखर्जी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, NSSCDCL यांनी नियमाच्या अधिन राहून त्यांच्या स्तरावर प्रचलित नियम व कायदा याप्रमाणे कार्यवाही करावी व याबाबतीत काही शंका असल्यास राज्य शासनाचे मार्गदर्शन प्राप्त करावे, असे सुचीत केले आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक १७.०२.२०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, NSSCDCL



Scanned with OKEN Scanner

नागपूर, श्री.अजय गुल्हाने, (भाप्रसे) यांनी राज्य शासनास पत्र देवून मार्गदर्शन मागितले असल्याचे आढळून येते. त्यात प्रस्तूत प्रकरणी नेमकी काय कार्यवाही झाली याबाबत विचारणा केलेली आहे. ते पत्र पुढीलप्रमाणे आहे.

"प्रति,

मा. प्रधान सचिव,

नगर विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई-400032.

**विषय:-** मा. राज्य माहिती आयोग यांचे दिनांक 13/12/2022 व 11/01/2023 रोजीच्या आदेशाबाबत

**संदर्भ:-**1. मा. राज्य माहिती आयोग यांचे आदेश क्र. जावक क्र. 7314 दिनांक 13/12/2022. या कार्यालयात प्राप्त दिनांक 27/12/2022

2. पोलीस उप निरिक्षक सदर पोलीस स्टेशन जावक क्र. 5664/12/2022 दिनांक 27/12/2022.

3. या कार्यालयाचे पत्र क्र. 1583 A/ Out/ NSSCDCL/2023 दिनांक 03/01/2023.

4. श्रीमती विजयालक्ष्मी हिरमेठ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सदर विभाग नागपूर यांचे पत्र क्र. 153/2022 दिनांक 21/01/2023 या कार्यालयास प्राप्त दिनांक 23/01/23.

5. मा. राज्य माहिती आयोग यांचे आदेश क्र. जावक क्र. 90 दिनांक 11/01/2023.

6. मा. अध्यक्ष, NSSCDCL चे दिनांक 16/02/2023 रोजी ईमेल द्वारे प्राप्त पत्र.

आदरणीय महोदया,

उपरोक्त प्रमाणे आपणास सादर करण्यात येते की, श्री संदीप जोशी (महापौर, मनपा), श्री संदीप जाधव (सत्तापक्ष नेता, मनपा) यांनी मा. तुकाराम मुंढे (माजी निगम आयुक्त, मनपा) यांच्याविरूद्ध आर्थिक घोटाळा, कलम 420 व अन्य विषयावर तसेच श्रीमती भानुप्रिया ठाकूर, कंपनी सचिव यांनी काही वैयक्तिक विषयांबाबत सदर पोलीस स्टेशन, नागपूर येथे अनुक्रमे 22/06/2020 व दि. 29/06/2020 रोजी तक्रार दाखल केली होती.

सदर तक्रार या कार्यालयात बंद लिफाफ्यात अनुक्रमे दि. 01/07/2020 व दिनांक 02/07/2020 रोजी पोलीस विभागामार्फत प्राप्त झाली होती सदर तक्रार NSSCDCL चे तत्कालीन अध्यक्ष मा. श्री प्रविणसिंह परदेशी, भाप्रसे यांच्या नावाने असल्याने सदर तक्रार त्यांच्या कार्यालयात दिनांक 02/07/2020 व 03/07/2020 रोजी पोस्टा मार्फत पाठविण्यात आली होती.

मा. आमदार श्री कृष्णा खोपडे, पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्र यांनी सदर प्रकरणी काय कार्यवाही करण्यात आली आहे त्याबाबत विचारणा करीता जन माहिती अधिकारी, सदर पोलीस स्टेशन यांच्या कडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अर्ज दिनांक 12/10/2020 सादर केला होता. सदर अर्जावर त्यांना समाधकारक उत्तर न मिळाल्याने त्यांनी मा. राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल सादर केले. त्यामध्ये जन माहिती अधिकारी, सदर पोलीस स्टेशन यांना सर्व कागदपत्रासह उपस्थित राहण्याचे आदेश मा. राज्य माहिती आयोगाने दिले.

त्या अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक, पो. स्टे, सदर, नागपूर शहर यांनी दि. 27/12/2022 रोजी या कार्यालयात पत्र सादर केले व त्यात त्यांनी सदर प्रकरणी NSSCDCL मार्फत काय कार्यवाही करण्यात आहे त्याबाबत विचारणा केली त्यावर सदर बंद लिफाफ्यात प्राप्त तक्रार मा. अध्यक्ष, NSSCDCL (तत्कालीन) यांच्या कडे पाठविण्यात आले आहे असे पत्र पोलीस विभागास दि. 03/01/2023 रोजी पाठविण्यात आले.



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सदर विभाग यांचे दिनांक 23/01/20 रोजीच्या पत्रानुसार पोलीस विभागाने सदर अपील प्रकरणातील वस्तुस्थिती दर्शक अहवाल आयोगास दिनांक 24/01/2023 रोजी व्यक्तीशः उपस्थित राहून सादर करण्याबाबत कळविले होते. दि. 24/01/23 रोजी च्या सुनावनी मध्ये मा. राज्य माहिती आयोगाने आदेश पारीत न करता सदर प्रकरणी काय कार्यवाही केली आहे. त्यात विचारण केली व पुढील सुनावनी 20/02/2023 रोजी ठेवलेली आहे. त्याअनुषंगाने सध्याचे मा. अध्यक्ष यांना पत्र लिहून सदर प्रकरणी मार्गदर्शन करावे अशी विनंती केली होती. त्यावर त्यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्र या कार्यालयात दिनांक 16/02/2023 रोजी ईमेल मार्फत प्राप्त पत्रानुसार त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमाच्या अधिन राहून कार्यवाही करावी व काही शंका असल्यास राज्य शासनाचे मार्गदर्शन घ्यावे असे नमूद केले.

सदर प्रकरणे समकक्ष असलेले श्री तुकाराम मुंढे, भाप्रसे, मा. आयुक्त, मनपा यांच्याशी संबंधित असल्याने व सदर या कार्यालयात प्राप्त बंद लिफाफे हे थेट अध्यक्ष यांच्या नावाने असल्याने तत्कालील अध्यक्ष श्री प्रविणसिंह परदेशी, भाप्रसे अध्यक्ष तथा अतिरिक्त मुख्य सचिव यांच्य कार्यालयात Speed Post ने पाठविण्यात आले होते, त्यावर तत्कालीन मा. अध्यक्ष यांच्या कार्यालयामार्फत काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती प्राप्त झाली नाही. करीता सदर प्रकरणावर नगर विकास विभागामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे याची माहिती या कार्यालयास होण्याकरीता आपल्या अधिनस्त अधिका-यांना कृपया निर्देश दयावे जेणे करून सदर माहिती प्राप्त होण्यास मदत होईल व करून राज्य माहिती आयोगास त्याबाबत अवगत करणे शक्य होईल."

याबाबतीत NSSCDCL नागपूर यांच्या वतीने दिनांक १०.०७.२०२० ते २९.०६.२०२१ या कालावधीत NSSCDCL नागपूर येथे झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीच्या(Board of Director) इतिवृत्ताची प्रत जोडलेली असून या व्यतिरिक्त इतर कोणतेही कागदपत्रे या प्रकरणात जोडण्यात आलेले नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम हा खरं तर शासनात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने संसदेने पारीत केलेला असून यात जास्तीत जास्त माहिती नागरीकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न सर्व स्तरावरुन करणे आवश्यक असून प्रस्तूत प्रकरणी भारतीय प्रशासकीय सेवेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्यावर करण्यात आलेल्या गंभीर आरोपाच्या संदर्भात तक्रार दाखल केली असता, त्यावर गुणवत्तेच्या आधारावर प्रचलित नियम व कायदा याच्या मर्यादेत राहून योग्य निर्णय घेणे हे सर्वच यंत्रणेचे कर्तव्य आहे.

प्रस्तूत प्रकरणी नगर विकास विभागाच्या वतीने अद्यापही दिनांक ३०.०६.२०२० रोजीच्या प्राप्त पत्रावर कोणतेही मार्गदर्शन अथवा निर्णय पारीत केलेला आढळून येत नाही. महाराष्ट्र शासनाने Maharashtra Government Servants Regulation of Transfers and Prevention of Delay in Discharge of Official Duties Act, २००५ पारीत केलेला आहे. यात विहीत मुदतीत सर्व निर्णय प्रक्रिया करण्यात यावी, असा उद्देश यात होता. विशेषतः त्यातील कलम १० मधील उपकलम (१) यात कोणतीही नस्ती संबंधित विभागास प्राप्त झाल्यानंतर ४५ दिवसाच्या आत त्यावर साधकबाधक निर्णय घेण्याचे आवश्यक असल्याचे सुस्पष्ट नमूद केले आहे. महाराष्ट्र दप्तर दिरंगाई कायदा राज्याच्या सर्वच विभागास लागू असून याचे उल्लंघन केल्यास कलम १०(२) व कलम १०(३) यात नमुद केल्याप्रमाणे योग्य त्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीची तरतुद देखील आहे. इतकी स्वंयस्पष्ट तरतुद राज्य शासनाने पारीत केलेल्या क्रांतिकारी स्वरुपाच्या कायद्यामध्ये असतांना देखील प्रस्तूत प्रकरणी नागपूर पोलिसांनी दिनांक ३०.०६.२०२० रोजी केलेल्या विनंतीला नगर विकास विभागाकडून कोणताही प्रतिसाद न मिळणे अतिशय खेदजनक बाब आहे. याबाबतीत मा. सर्वोच्च



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर महाराष्ट्र * नागपूर

Scanned with OKEN Scanner

न्यायालयाने सुभाषचंद्र अग्रवाल विरुध्द CPIO या प्रकरणात प्राध्यापक TRS Allen यांचे अवतरण खालीलप्रमाणे उध्दृत केले आहे.

"Powers may be conferred on public officials and agencies for the attainment of appropriate ends, consistent with a plausible account of the public good; but such powers must not be abused for extraneous ends, serving only private interests, nor wielded in a manner that undermines the ideal of freedom as independence. No one should be at the mercy of unfettered official discretion; and the enforcement of legal constraints on such discretion is a necessary part of the idea of government according to law."

तसेच यातील परिच्छेद क्र. ६६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.

"Now, if secrecy were to be observed in the functioning of Government and the processes of Government were to be kept hidden from public scrutiny, it would tend to promote and encourage oppression, corruption and misuse or abuse of authority, for it would all be shrouded in the veil of secrecy without any public accountability. But if there is an open Government with means of information available to the public, there would be greater exposure of the functioning of Government and it would help to assure the people a better and more efficient administration. There can be little doubt that exposure to public gaze and scrutiny is one of the surest means of achieving a clean and healthy administration. It has been truly said that an open Government is clean Government and a powerful safeguard against political and administrative aberration and inefficiency."

प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी श्री. कृष्णा खोपडे यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने व वरील सर्व बाबींचे निरीक्षण केले असता, यात पोलीस स्टेशन सदर, नागपूर शहर यांनी तत्कालीन मनपा आयुक्त यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या उत्तरादाखल केवळ नगर विकास विभागाने मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांना निर्गमित केलेल्या पत्राव्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. तसेच मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने देखील सर्व तक्रारी हया केवळ तत्कालीन मा. अध्यक्ष NSSCDCL नागपूर यांना बंद लिफाफ्यासह सादर केल्या असून त्याची एक प्रत ही विद्यमान अध्यक्ष यांनी विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी, NSSCDCL नागपूर यांना प्रदान करण्यात आलेली असून त्यातील प्रस्तूत तक्रार ही त्यांच्या अधिनस्त एका महिला कर्मचारी यांनी केलेली असल्यामुळे त्यांच्या स्तरावर प्रचलित नियम व कायद्यांतर्गत निर्णय घेण्याची केलेली सुचना इत्यादी बाबी लक्षात घेता, यात प्रत्यक्षात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नसून नागपूर पोलिसांच्या वतीने माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने प्राप्त अर्ज मा. सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आदेशाने जा.क्र.सह पोआना/१५६/२०२०, दिनांक ३०.०६.२०२० अन्वये मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना मार्गदर्शनासाठी पाठविले असल्याचे आढळून येते. तसेच महिला कर्मचारी यांनी केलेल्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारीविषयी NSSCDCL नागपूर यांच्या वतीने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. यातील



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

Scanned with OKEN Scanner

खुलाश्यासोबत सादर केलेल्या पत्रात दिनांक ०१.११.२०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर असलेल्या अधिका-यांनी मात्र याच प्रकरणात संबंधित महिला कर्मचारी यांची तक्रार ही राष्ट्रीय महिला आयोगाकडे प्रलंबित असल्यामुळे त्यांच्या NSSCDCL नागपूर येथील विधी सल्लागार यांनी या प्रकरणात प्रकरण हे एका न्यायीक अथवा अर्धन्यायीक प्राधिकरणाकडे प्रलंबित असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी हे यावर निर्णय घेऊ शकत नाही, असे सुचीत केले आहे.

मात्र वरील पत्र हे संबंधित महिला कर्मचारी यांनी त्यांच्या मातृत्व रजा कालावधीतील पगार मिळण्याबाबतच्या केलेल्या अर्जाच्या संबंधित असून प्रत्यक्षात याची ४ पाने तक्रार ही सदर पोलीस स्टेशन येथे दाखल केलेली आहे, त्यावर पोलिसांनी देखील कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे सादर केलेल्या कागदपत्राच्या अवलोकनावरुन आढळून येते. NSSCDCL नागपूर यांचेकडून देखील यावर कोणताही सकारात्मक प्रतिसाद सादर करण्यात आलेला नसून प्रस्तूत प्रकरणात वेळ काढू पणाचे धोरण अवलंबिण्यात आलेले असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. यात अपिलार्थी यांच्या वतीने सादर करण्यात आलेला Cri.M.A.No.१८९०/२०२०, Sandeep & other Vs. State या प्रकरणाचे अवलोकन केले असता, यात दिनांक २७.०८.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशात प्रस्तूत प्रकरणातील मुद्दा क्र. १ चे गांभीर्य सहजपणे लक्षात येते. यात तत्कालीन मनपा आयुक्त, यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता मधील कलम ४०६, ४०९, ४२०, ४६३, ४६४, ४६५, ४६८, व ४७१ या कलमाखाली तसेच कंपनी कायद्याच्या कलम ४४७ खाली गुन्हा दाखल करण्याची केलेली विनंती या संदर्भाने वरील माहिती अर्ज दाखल केलेला आहे. अशा प्रकरणी सादर केलेला अर्ज हा केवळ वरिष्ठ प्राधिकरणाकडे मार्गदर्शनास्तव अग्रेषित करण्यात आलेला आहे, असे उत्तर दिल्याने प्रशासनातील पारदर्शकता व काही विशिष्ट लोकांचा बचाव करण्याची घेतलेली भुमिका तर नाही ना? असा प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

या प्रकरणात यापूर्वीच सर्वच संबंधितांना बराच वेळ प्रकरणाचा अद्ययावत अहवाल व त्यांचेकडे प्राप्त पत्रावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यासाठी देण्यात आलेला आहे. यात NSSCDCL नागपूर यांच्या वतीने दिनांक १७.०२.२०२३ रोजी नगर विकास विभागाला केलेली विचारणा तसेच सदर पोलीस स्टेशनच्या वतीने मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना निर्गमित करण्यात आलेले पत्र याअनुषंगाने कोणताही प्रतिसाद मिळालेला नसल्याचे अथवा मिळाला असल्यास तो सादर केलेला नसल्याचे आढळून येते. ही बाब पारदर्शक प्रशासन व कायदा आणि समान नागरी तत्वाचा भंग करणारी असल्यामुळे प्रस्तूत प्रकरणी खालीलप्रमाणे निर्देश जारी करणे संयुक्तिक ठरेल, असे आयोगाचे मत आहे.

१) मा. सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या वतीने नगर विकास विभागास सादर करण्यात आलेले दिनांक ३०.०६.२०२० रोजीचे पत्र व त्याअनुषंगाने याचा केलेला पाठपुरावा तसेच दिनांक ०४.०१.२०२३, २४.०१.२०२३ व २०.०२.२०२३ रोजी आयोगासमोर सादर करण्यात आलेले सर्व कागदपत्रे, या अनुषंगाने सदर पोलीस स्टेशन यांनी दिनांक २१.०१.२०२३ रोजी मा. अतिरिक्त प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई व मा. चेअरमन, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी, डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमी. नागपूर यांना निर्गमित केलेले पत्र व त्याअनुषंगाने दिनांक १७.०२.२०२३ रोजी NSSCDCL नागपूर यांच्या वतीने नगर विकास विभागास सादर केलेला सविस्तर अहवाल व

मागितलेले मार्गदर्शन याबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांनी स्वत: या प्रकरणाचा आढावा घेवून नेमका या प्रकरणात निर्णय घेण्यासाठी ३ वर्षाचा विलंब का झाला?, याची शहानिशा करुन दफ्तर दिरंगाई कायदा २००५ व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक १८ जानेवारी २०१३ रोजीचे परिपत्रक व मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ६७३१/२०१२ यात पारीत केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आढावा घेवून या प्रकरणात झालेल्या असमर्थनीय विलंबास जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशासकीय स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

२) नागपूर पोलिसांच्या वतीने सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी दिनांक ३०.०६.२०२० रोजी नगर विकास विभागास सादर करण्यात आलेल्या मार्गदर्शन पत्रावर संबंधित विभागास यावर तात्काळ निर्णय घेण्यासाठी सुचना हया मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांनी पारीत करणे संयुक्तिक ठरेल, असे आयोगाचे प्राथमिक मत आहे. प्रस्तूत प्रकरण हे एका प्रशासकीय वरिष्ठ अधिकारी यांचेवर गंभीर स्वरुपाची आर्थिक अनियमितता करण्यात आलेले असल्याबाबतचे आरोप असल्यामुळे यावर तात्काळ निर्णय घेवून योग्य ती कार्यवाही करणे हे स्वच्छ व पारदर्शक प्रशासनाच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे. वरील आरोपात तथ्य आढळल्यास त्यावर प्रचलित नियमानुसार पुढील प्रशासकीय/फौजदारी कार्यवाही करणे हे प्रशासन व पोलीस प्राधिकरण यांना सुकर होईल. तसेच वरील तक्रारीमध्ये तथ्य न आढळल्यास एका वरिष्ठ अधिकाऱ्यावर केलेल्या आरोपाचे निराकरण देखील करता येईल.

३) मुद्दा क्र. २ शी संबंधित बाब मात्र NSSCDCL नागपूर येथे कार्यरत महिला कर्मचारी यांनी सदर पोलीस स्टेशन, नागपूर येथे दिनांक २९.०६.२०२० रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही यावर प्रथमदर्शनी तरी कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे आढळून येते. जरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये कार्यवाहीचे निर्देश देणे अपेक्षित नसले तरी सादर केलेल्या तक्रारीवर मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पोलीस प्राधिकरणाने चौकशी करुन तक्रार अर्ज फेटाळणे अथवा त्यात प्रथमदर्शनी तथ्य आढळून आल्यास नियमातंर्गत FIR दाखल करणे अपेक्षित आहे. मात्र यात यापैकी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यामुळे केवळ NSSCDCL नागपूर यांच्या अध्यक्षांकडे प्रस्तूत तक्रार बंद लिफाफ्यात स्पिड पोस्टाने पाठविली. ३ वर्षानंतरही सदर तक्रार ही बंद लिफाफ्यात असून त्यावर प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. विद्यमान मा. अध्यक्ष NSSCDCL नागपूर यांनी दिनांक १४.०२.२०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, NSSCDCL नागपूर यांना निर्देश केल्याप्रमाणे यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रचलित नियमाअंतर्गत व कायद्यांतर्गत त्यांना प्रदत्त केलेल्या अधिकारान्वये सदर तक्रार अर्जावर योग्य तो निर्णय घेवून याची माहिती आयोगास सादर करावी. या प्रकरणी यापूर्वी झालेल्या सुनावणीत अद्ययावत माहिती व करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती या विषयाचा तपशिल मागितला असता, मिळालेला प्रतिसाद फारसा समाधानकारक नाही. याचे कारण कदाचित या प्रकरणात नमूद केलेली नावे असल्याची आशंका देखील समाजातील काही वर्गाकडून व्यक्त केली जाऊ शकते. त्यामुळे कोणत्याही पारदर्शक व्यवस्थेत Caesar's wife must be above suspicion हे असते. ज्यात सर्व उच्च पदस्थ अधिकारी/पदाधिकारी व नेते यांचेवर संशयाची कुठलीही



Scanned with OKEN Scanner

सुई असणे हे कोणत्याही सदृढ व्यवस्थेसाठी निकोप अशी बाब नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही कायद्याचे पालन करणाऱ्या समाजाचे मुलतत्व "Be you ever so high, the law is always above you" लक्षात ठेवून सर्व संबंधित प्राधिकरण यावर लवकरात लवकर प्रचलित नियम, कायदा, शासकीय धोरण व संवैधानिक न्यायालयाने निर्देशीत केलेले मार्गदर्शन तत्वे इत्यादीचे पालन करुन निर्णय घेणे हे माहिती अधिकार कायद्याला किंवा कायद्याचे राज्य या संकल्पनेला सुसंगत ठरेल. अर्थातच असे निर्णय घेतांना नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन सर्व संबंधितांना त्यांची बाजु मांडण्यासाठी न्याय व सुयोग्य संधी प्रदान करण्याची कार्यवाही देखील अपेक्षित आहे. यात अपेक्षित वरील आदेशाचे अनुपालन या प्रकरणात यापूर्वीच झालेला असमर्थनीय विलंब लक्षात घेवून शक्य तितक्या लवकर करण्यात यावे, असे निर्देश देण्यात येत आहे.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून सदर प्रकरणी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांनी व्यक्तिश: शहानिशा करुन आढावा घेणे अधिक संयुक्तिक ठरेल, अशी विनंती त्यांना करण्यात येत आहे.

सदर आदेशाची प्रत, १) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई, २)मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई, ३) मा. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा), मंत्रालय मुंबई, ४) मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर ५) मा.अध्यक्ष, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी, डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमी. नागपूर व ६) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी, डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमी. नागपूर यांना योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे.

## आदेश

उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २०.०२.२०२३**

**प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई.
३) मा. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा), मंत्रालय मुंबई.
४) मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर
५) मा.अध्यक्ष, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी, डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमी. नागपूर(NSSCDCL)
६) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमी. नागपूर (NSSCDCL)

जावक क्रमांक 4872 दिनांक 21 AUG 2023



Scanned with OKEN Scanner